नि.दि.दा.क्र. १३१/२०१९
रघुनाथ वि. पोपट व इतर
नि.क्र. ३३ लगत

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. डी. टी. मांडगे यांचेमार्फत शपथेवर सुरुः**

११. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या खरेदीखतातील चतुःसिमा अंतर्गत मिळकतीमध्ये तसेच, दुरुस्त दाव्यातील दावा मिळकतीच्या चतुःसिमा अंतर्गत मिळकतीमध्ये माझा ताबा नाही. प्रतिवादीं विनाकारण माझ्या दावा मिळकतीतील वहिवाटीस हरकत अडथळा करत असल्याबाबत मी तहसिलदार श्रीगोंदा यांच्याकडे अर्ज दाखल केलेला नाही. दिनांक ०२-०३-२०१९ रोजी बेलवंडी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीची प्रत मी या दाव्यात दाखल केलेली नाही. दावा मिळकतीमध्ये असलेल्या बोअरवेल, विहिर यावर बसविलेल्या पंपाचे विज बील मी या दाव्यात दाखल केलेले नाही. दावा मिळकतीमध्ये घेतलेल्या उस पिकाचे कारखान्याचे बील मी या दाव्यात दाखल केलेले नाही. दावा मिळकती संदर्भात महसूल कार्यालयाकडे भरलेले शेतसारा बील मी या दाव्यात हजर केलेले नाही. दावा मिळकतीमधील पिकांचा विमा काढल्याबाबतची कागदापत्रे मी या दाव्यात दाखल केलेली नाही. मी बाजार समितीकडे दावा मिळकतीमधील शेतमाल पाठविल्याबाबतच्या पावत्या दाखल केलेल्या नाहीत.

१२. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ने माझ्या व इतर काही लोकांच्या विरुध्द गट क्र. ७५५, ७५१ बाबत दिवाणी दावे दाखल केले असून गट क्र. ७५५, ७५६ व ७५१ मधील मिळकती पुर्णपणे वेगवेगळ्या आहेत व गट क्र. ७५५ व ७५१ मधील मिळकतींचा दावा मिळकतीशी कोणत्या प्रकारचा संबंध नाही, हे मी दाव्यात खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीं दावा मिळकतीमधील माझ्या वहिवाटीस दोन महिन्यापासून वारंवार हरकत अडथळा करत आहेत, हे मी खोटे कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती मार्फत समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तरी देखील प्रतिवादीं जुमानत नाही, हे मी दाव्यात खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१-०३-२०१९ रोजी

नि.दि.दा.क्र. १३१/२०१९
रघुनाथ वि. पोपट व इतर
नि.क्र. ३३ लगत

मी दावा मिळकतीमध्ये नांगरट करत असताना प्रतिवादींनी बेकायदेशीरपणे दावा मिळकतीमध्ये येऊन मला शिवीगाळ व दमदाटी करून धक्काबुक्की केली हे मी दाव्यात खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२-०३-२०१९ रोजी मी प्रतिवादींविरुध्द बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली, परंतु पोलीसांनी कोणतीही दखल घेतली नाही, हे देखील मी दाव्यात खोटे कथन केले आहे.

१३. हे म्हणणे खरे नाही की, दाव्याला कोणतेही कारण घडले नसताना मी प्रतिवादींविरुध्द खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही माझ्या वडीलांनी खरेदी घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत माझ्या वडीलांच्या मृत्यु पश्चात माझा भाऊ व माझ्या नावे नोंद झाली. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या खरेदीखतापासून माझ्या वडीलांची व त्यांच्या मृत्यु पश्चात आमची दावा मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत दाव्यात कायम मनाईची केलेली मागणी ही खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासः काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

PATIL PRAVIN VISHWAS
Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2025.10.13 17:52:34 +0530

दि.१३-१०-२०२४

(प्रवीण व्ही. पाटील)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, श्रीगोंदा.